**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ११५/२०२५**

**तक्रारकर्ता,** श्री.संदेश सदाशिव म्हस्के,
घर क्र.४६५, गणेश कृपा सोसायटी, बी विंग,
१०३, सांसोडेगाव, गावदेवी मंदिर जवळ, नेरुळ,
नवी मुंबई ४००७०६

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी, ई-विभाग कार्यालय कोपरखैरणे, नवी मुंबई महानगरपालिका, सेक्टर ६, चिकणेश्वर बसडेपोसमोर, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

तत्कालीन जन माहिती अधिकारी, ई-विभाग कार्यालय कोपरखैरणे, नवी मुंबई महानगरपालिका, सेक्टर ६, चिकणेश्वर बसडेपोसमोर, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

**तक्रार सुनावणीचा दिनांक : ९/९/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २९/१/२०२५ | ---- | ४/३/२०२५ | ---- |

तक्रारकर्ता यांनी दि.६/३/२०२५ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ९/९/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*"नेरुळ विभागातील वेबसाईटवर MH-४३-BG-५९४६ याबाबत सदर वाहन नेरुळ विभागातून दि.०१.०२.२०२१ बेवारस म्हणून उचलण्यात आले सदर वाहन कोठे व कधी नेण्यात आले सदर वाहन भंगारात काढले असल्याचा तपशिल व लिलाव, नोटीस, वाहन गाडी मालकास लीलाव नोटीस बँक लोन असल्यामुळे बँक नोटीस आरटीओ परवाना इ. मिळणेबाबत व इतर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

जन माहिती अधिकारी हे सुनावणीस अनुपस्थित आहेत. कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट पोस्ट संकेतस्थळावर दिसून येत नाहीत.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी, ई विभाग कार्यालय कोपरखैरणे, नवी मुंबई महानगरपालिका यांनी **तक्रारकर्ता यांना माहिती १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. तत्कालिन जन माहिती अधिकारी, ई विभाग कार्यालय कोपरखैरणे, नवी मुंबई महानगरपालिका (दि.२९/१/२०२५ रोजीच्या माहिती अर्ज विषयासंदर्भात कार्यरत असलेले) यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २९/१/२०२५ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात

येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. तत्कालिन जन माहिती अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय प्राधिकारी, ई विभाग कार्यालय कोपरखैरणे, नवी मुंबई महानगरपालिका यांनी पुढील सुनावणीस सुनावणीस व्यक्तिशः आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे.

४. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२९/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्द्रे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ९ सप्टेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

१) तत्कालिन जन माहिती अधिकारी, ई विभाग कार्यालय कोपरखैरणे, नवी मुंबई महानगरपालिका (दि.२९/१/२०२५ रोजीच्या माहिती अर्ज विषयासंदर्भात कार्यरत असलेले) **व** प्रथम अपीलीय प्राधिकारी, ई विभाग कार्यालय कोपरखैरणे, नवी मुंबई महानगरपालिका – **यांना प्रत** --

-- उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग,
नवी मुंबई महानगरपालिका, मुख्यालय,
सेक्टर १५ अे, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ **यांचेमार्फत रवाना.** (उपायुक्त यांनी सदरची प्रत संबंधित तत्कालिन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांना तात्काळ बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)

२) उप आयुक्त (अतिक्रमण),
नवी मुंबई महानगरपालिका, मुख्यालय,
सेक्टर १५ अे, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४